# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 April 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०५ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची आज छाननी, नांदेडमध्ये ६६ उमेदवार पात्र तर परभणीत ६४ अर्ज वैध
- निवडणुकीसाठी काँग्रेसचा न्यायाच्या पाच स्तंभांवर आधारीत जाहीरनामा घोषित
- रिझर्व्ह बँकेचं आर्थिक वर्ष २०२४-२५ मधलं पहिलं द्वैमासिक पतधोरण जाहीर

आणि

- उद्यापासून येत्या नऊ तारखेपर्यंत मराठवाड्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची आज छाननी करण्यात आली. या टप्प्यात, १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांसाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या हिंगोली, नांदेड, परभणी, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ-वाशिम या आठ मतदारसंघांचा समावेश आहे.

नांदेड लोकसभा निवडणुकीसाठीच्या अर्जांच्या आज झालेल्या छाननीमध्ये ६६ उमेदवार पात्र ठरले आहेत तर आठ उमेदवार अपात्र ठरले आहेत.

परभणी लोकसभा मतदारसंघामध्ये दाखल झालेल्या ६५ अर्जांपैकी ६४ अर्ज वैध ठरले.

अकोला मतदारसंघात दाखल झालेल्या एकूण अठ्ठावीस अर्जांपैकी सतरा उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले, तर बुलडाणा लोकसभा मतदारसंघात चार उमेदवारांचे अर्ज बाद करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

पात्र उमेदवारांना ८ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत.

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रचारानं आता वेग घेतला आहे. सगळ्याच पक्षांचे दिग्गज प्रचारक ठिकठिकाणी सभा घेत आहेत तसंच रोड शो करत आहेत. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थानात चुरू इथं निवडणूक प्रचार सभा घेतली. पंतप्रधान येत्या आठ तारखेला महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यातल्या प्रचारासाठी येणार आहेत. चंद्रपूर- वणी- आर्णी लोकसभा मतदारसंघातले भाजपा उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारासाठी ते मोरवा इथं सभा घेणार आहेत.

भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी आज गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे भाजपचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ देसाईगंज आणि चामोर्शी इथं प्रचार सभा घेतली. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंदापूर इथं भाजपच्या कार्यकर्ता मेळाव्याला सबोधित केलं.

****

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आपला जाहीरनामा आज घोषित केला. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि वरिष्ठ नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत हा जाहीरनामा जारी केला. मनरेगा योजनेत मजुरांना प्रति दिवस किमान चारशे रुपये मजुरीची हमी, युवकांना रोजगार, तो न मिळाल्यास परिवाराला दर वर्षी एक लाख रुपये, केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये महिलांना पन्नास टक्के आरक्षण, किमान हमी भावासाठी कायदेशीर हमी, आणि राष्ट्रीय स्तरावर जातनिहाय जनगणना, अशी आश्वासनं यात देण्यात आली आहेत. हा जाहीरनामा पंच न्याय म्हणजे न्यायाच्या पाच स्तंभांवर आधारीत असून, युवक, महिला, शेतकरी, मजूर आणि लोकसंख्येच्या प्रमाणात संधी, हे ते पाच स्तंभ असल्याचं, खरगे यांनी सांगितलं.

****

मतदानात मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागासाठी वेगवेगळा कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत. मतदानाचं प्रमाण अत्यल्प असलेल्या भागातल्या महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक त्यांनी आज नवी दिल्लीत घेतली, त्यात ते बोलत होते. या बैठकीमध्ये राज्यातल्या मुंबई,

नागपूर, पुणे, ठाणे या पालिकांचे आयुक्त सहभागी झाले होते. मतदान करण्याचा अभिमान वाटावा अशा प्रकारे जागृती करण्याचं आवाहन कुमार यांनी यावेळी केलं.

****

मुंबईतल्या चेंबूर आणि गोवंडी विधानसभा मतदारसंघातल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या दोनशेहून जास्त पदाधिकाऱ्यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, भाजपा मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यावेळी उपस्थित होते.

****

राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा `लोकनिर्णय महाराष्ट्राचा` हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण गडचिरोली–चिमूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आर्थिक वर्ष २०२४–२५ मधलं पहिलं द्वैमासिक पतधोरण आज जाहीर केलं. सलग सातव्यांदा व्याजदरात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. रेपोदर सहा पूर्णांक पाच टक्क्यांवर स्थिर असून, महागाईत घट पाहायला मिळाल्याचं आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी म्हटलं आहे. चालू आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन दर सात टक्के, आणि ग्राहक किंमत निर्देशांक चलनवाढ चार पूर्णांक पाच टक्के राहण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली. बँकेत रोख जमा करण्यासाठीच्या यंत्रांमधे युपीआयचा वापर करून पैसे जमा करण्यासाठी रिझर्व्ह बँक लवकरच परवानगी देणार असून, या सुविधेमुळे ग्राहकांची सोय होईल आणि बँकामध्ये पैसे हाताळण्याची प्रकिया अधिक कार्यक्षम होईल असंही दास यांनी सांगितलं.

****

सगळ्या उच्च शिक्षण संस्थांनी, टेलिमानस, या मानसिक स्वास्थ्यासंबंधित नि:शुल्क मदतवाहिनीबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती करावी, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगानं दिले आहेत. आयोगानं सगळ्या विद्यापीठांच्या कुलगुरु आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांना याबाबत पत्र लिहिलं आहे. आरोग्य आणि कुटुंब

कल्याण मंत्रालयानं २०२२ च्या जागतिक मानसिक आरोग्य दिनी सुरू केलेली ही मदतवाहिनी उत्तम काम करत असून, लोकांमध्ये याबाबत व्यापक प्रचार करावा, असं आयोगानं या पत्रात म्हटलं आहे.

****

कुख्यात गुंड अरुण गवळी याची, मुदतपूर्व सुटका करण्याची याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं आज मान्य केली. न्यायालयानं कारागृह व्यवस्थापनाला याप्रकरणी उत्तर देण्यासाठी चार आठवड्यांची मुदत दिली आहे. मुंबई शिवसेनेचे नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांची हत्या तसंच अन्य गुन्ह्यांच्या प्रकरणात अरुण गवळीला दोन जन्मठेपांची शिक्षा सुनावण्यात आलेली असून, तो गेल्या सोळा वर्षांपासून कैदेत आहे. शिक्षा भोगणाऱ्या कैद्याचं वय पासष्ट वर्षं पूर्ण झालं असेल आणि तो शारीरिकदृष्ट्या अशक्त झाला असेल तर त्याची मुदतपूर्व सुटका करण्याबाबत विचार केला जाऊ शकतो, असा शासन निर्णय आहे. याच्या आधारावर गवळीनं ही याचिका दाखल केली होती.

****

लोकशाहीच्या उत्सवात अर्थात मतदानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावं, यासाठी छत्रपती संभाजीनगर इथं प्रशासनातर्फे विविध ठिकाणी मतदार जागृती कार्यक्रम सुरू आहेत. त्यात आज किराडपुरा इथल्या मनपा केंद्रीय प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रहीम नगर, बारी कॉलनी, किराडपुरा, सेंट्रल नाका या विभागात फेरी काढून जनतेला मतदान करण्याबाबत आवाहन केलं. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदान जागृतीबाबत पथनाट्यही सादर केलं. याशिवाय, माझे आई बाबा मतदान करणारच, माझे आजी आजोबा मतदान करणारच, या घोषवाक्याचे फलक विद्यार्थ्यांनी आपापल्या परिसरात चिकटवले.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, नांदेड जिल्ह्यात गुन्हेगारांच्या वीस टोळ्यांमधल्या साठ जणांना हद्दपार तर चौदा जणांना तुरुंगात स्थानबद्ध केलं आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी ही माहिती दिली.

****

हवामान

उद्यापासून येत्या नऊ तारखेपर्यंत मराठवाड्यात काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. यामध्ये परवा सात तारखेला छत्रपती संभाजीनगर, लातूर, बीड आणि धाराशीव जिल्ह्यात, आठ तारखेला छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशीव आणि परभणी जिल्ह्यात तर नऊ तारखेला छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर आणि धाराशीव जिल्ह्यात पाऊस पडण्याची शक्यता आहे. यासोबतच, सात तारखेला नांदेड तर आठ तारखेला नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यात गारपीट होण्याची शक्यताही हवामान खात्यानं वर्तवली आहे.

****